## निवासी श्रमसंस्कार शिबिर अहवाल सत्र २०२३ -२४

श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय अमरावती येथील राष्ट्रीय सेवा योजनेचे सत्र २०२३ - २४ मधील निवासी श्रमसंस्कार शिबिर ग्राम शिराळा तालुका जिल्हा अमरावती येथे दि.१ फेब्रुवारी ते दि. ८ फेब्रुवारी २०२४ दरम्यान यशस्वीरित्या पार पडले.शिबिरामध्ये गावातील विद्यार्थ्यांसाठी तसेच ग्रामस्थांकरिता विविध शैक्षणिक, सामाजिक तसेच बौद्धिक व कौशल्यावर आधारित विविध उपक्रम राबविण्यात आले. त्यामध्ये नव उपक्रम व तंत्रज्ञान कार्यशाळा अटल ट्रिंकलिंग लॅब, अंतराळाशी हितगुज, विद्यार्थ्यांना निर्भय व्हा, रोबोटिक गेम, शेतीपूरक व्यवसाय कार्यशाळा व मार्गदर्शन उद्योजकता, बचत गट कार्यशाळा, सामाजिक वनीकरण, आरोग्य निदान शिबिर व शिवकालीन साहित्याचे व युद्ध सामग्रीचे प्रदर्शन असे विविध उपक्रम राबवण्यात आले. ग्रामीण भागातील लोकांसाठी स्वच्छते संदर्भात जनजागृती म्हणून विविध पथनाट्य, रॅली तसेच घनकचरा निर्मूलनाचे सुद्धा काम दैनंदिन कार्यक्रम सूची मध्ये नेहमीसाठी आखण्यात आलेले होते. विद्यार्थ्यांना त्यांच्या व्यावहारिक जीवनामध्ये योग व त्याचे महत्त्व या संदर्भात रोज सकाळी योगासने व प्राणायाम यांचा समावेश करण्यात आला होता

ग्रामीण जीवनामध्ये जगत असताना कुठल्या गोष्टी या प्राथमिक स्वरूपामध्ये महत्त्वाच्या असतात याची कल्पना विद्यार्थ्यांना या श्रमसंस्कार शिबिरातून झाली व तसेच एक जागृत नागरिक म्हणून विद्यार्थ्यांच्या दृष्टिकोनातून त्याच्या सामाजिक जबाबदाऱ्या काय आहेत, समाजाप्रती त्याची जबाबदारी काय आहे याचीही ओळख या निमित्ताने विद्यार्थ्यांना या शिबिरातून झाली. निसर्गाच्या सानिध्यात जगत असताना आपली स्वच्छता व तसेच आपल्या परिसराची स्वच्छता आणि पर्यावरणाची सुद्धा जपवणूक आपण करायला हवी.पक्षी निरीक्षणासारख्या कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना आपल्या सभोवताली असलेल्या इतर जीवांची सुद्धा काळजी आपण कशी घ्यावी यासंदर्भात माहिती त्यांना मिळाली.

### १ फेब्रुवारी २०२४ दिवस पहिला (गुरुवार)

राष्ट्रीय सेवा योजनेची सर्वच जम्मू हे निवासी ग्राम संस्कार शिबिर शिराळा येथील आठ दिवसीय शिबिराकरिता लागणाऱ्या सर्व वस्तू घेऊन म्हणजे श्रमदानाचे साहित्य, पुस्तके साहित्य. स्वयंसेवक म्हणून आपापले सर्व साहित्य घेऊन सकाळी साडेबारा वाजता १०० विद्यार्थ्यांचे पथक श्री शिवाजी कृषी विज्ञान उद्यान महाविद्यालयाची गाडी घेऊन दुपारी ०२:०० वाजता शिराळाला पोहोचले. त्यानंतर विद्यार्थिनींनी आपल्या राहण्याच्या व कार्यक्रमाच्या अधिवासाची साफसफाई केली व सर्व

परिसर हा कार्यक्रमासाठी तसेच राहण्यासाठी सुसज्ज केला.संध्याकाळला राष्ट्रीय सेवा योजनेचे गीत तसेच प्रार्थना झाली व त्यानंतर विद्यार्थ्यांनी पुढील दिवसाची रुपरेषा आखून नियोजन करण्याकरिता एकत्रित आले व जेवण घेऊन या दिवसाचा समारोप झाला.

## ०२ फेब्रुवारी २०२४ दिवस दुसरा (शुक्रवार)

शिबिराचा उद्‌घाटन समारंभ दि.०२ ला अध्यक्ष म्हणून लाभलेल्या मा.श्री.भैय्यासाहेब पाटील पुसदेकर,उपाध्यक्ष श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती, उद्‌घाटक मा.श्री निलेश कडू क्षेत्रीय समन्वयक संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती व प्रमुख उपस्थिती म्हणून प्रा.सुभाषराव बनसोड कार्यकारणी सदस्य श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती, मा.श्री मनोज भाऊ देशमुख अध्यक्ष कस्तुराबाई जैन विद्यालय शिराळा, मा.श्री गजानन कोरपे प्राचार्य श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय अमरावती, श्री बाळासाहेब देशमुख आजीवन सदस्य श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती, कु. अंकिता तायडे सरपंच ग्राम शिराळा, श्री अनिकेत खाडे उपसरपंच ग्राम शिराळा, श्री सचिन भाऊ देशमुख मुख्याध्यापक कस्तुराबाई जैन विद्यालय शिराळा तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे सर्व कार्यक्रम व सहाय्यक कार्यक्रम अधिकारी व विद्यार्थी तसेच काही ग्रामस्थ यांच्या उपस्थितीत उस्फुर्तपणे पार पडला.

## ०३ फेब्रुवारी २०२४ दिवस तिसरा (शनिवार)

दिवसाची सुरूवात पहाटे ६:०० वाजता च्या प्रार्थना तसेच भक्तीगीतेने झाली.त्यानंतर विद्यार्थ्यांनी नवचेतना योगक्रिया प्राणायाम तसेच विविध आसने केली.नियोजित कार्यक्रमांनुसार विद्यार्थ्यांनी त्यांचा अल्पपहार व चहा आटोपल्यानंतर गावामध्ये शोष खड्ड्याच्या निर्मिती करता श्रमदान केले.

तसेच परिसरातील आसपासच्या शाळा एकत्र घेऊन गावातील शालेय विद्यार्थ्यांसाठी नवग्रह व तंत्रज्ञान कार्यशाळा ही मोठ्या उत्साहात आयोजित करण्यात आली होती त्याकरता श्री मंगेश भारतीय समूह यांनी शालेय विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिके करून रोबोटिक्स व ड्रोन टेक्नॉलॉजी संदर्भात महत्त्वाचे मार्गदर्शन केले.

दु. ४:०० ते ६:०० या वेळेमध्ये नामवंत कवी डॉ.राजू शिंदे यांनी बौद्धिक सत्र आधारे विद्यार्थ्यांमध्ये नवचैतन्य तारुण्य निर्माण केले. त्यांनी स्वामी विवेकानंद व त्यांना अपेक्षित असलेला तरुण या विषयावर विद्यार्थ्यांना सखोल असे विचार व्यक्त केले व विद्यार्थ्यांना समाजहितासाठी तसेच देशहितासाठी एकत्रितपणे पुढे हा नारा दिला. संध्याकाळच्या वेळेला पुन्हा प्रार्थना गीत व भावगीत विद्यार्थ्यांनी म्हटले व त्यानंतर विद्यार्थ्यांनी या श्रमसंस्कार शिबिरांमध्ये सादर करत कराव्या लागणाऱ्या विविध पथनाट्याचा सराव केला व अशाप्रकारे दिवस तिसरा चे नियोजन यशस्वीरित्या पार पडले.

### ०४ फेब्रुवारी २०२४ दिवस चौथा (रविवार)

कार्यक्रमाच्या चौथ्या दिवशी नियमित प्रमाणे, विद्यार्थ्यांनी अगदी पहाटे उठून राज्य गीत तसेच गीते म्हणून चहा दिवसाची सुरुवात केली त्यानंतर प्राणायाम योगासने इत्यादी वगैरे झाली व विद्यार्थी आपल्या श्रमदानाला निघून गेले.

श्रमदानावरून आल्यानंतर विद्यार्थ्यांनी डॉ.पंजाबराव भाऊसाहेब देशमुख तसेच श्री संत गाडगे महाराज ह्या दोघेही महान व्यक्तींच्या प्रति आदरांजली म्हणून शिरळा गावामध्ये रथयात्रा काढण्यात आली व त्या रथयात्रा मध्ये प्रमुख उद्देश हा डॉ.पंजाबराव भाऊसाहेब देशमुख यांचा समस्त मानवजातीला जातील परिचय करून द्यावा तुमचा परिचय करून व्हावा. याकरता तो उद्देश होता.त्याच दरम्यान विद्यार्थ्यांनी सायबर सिक्युरिटी तसेच आणखी एका विषयावर पथनाट्य सादर केले दुपारी जेवण झाल्यानंतर दुपारच्या सत्रांमध्ये डॉ.मनोज सपकाळ यांनी तरुणांना तरुण असूनही रक्त न उसळे नवजवान या वर अतिशय माहितीपूर्वक असे व्याख्यान दिले. संध्याकाळच्या वेळेला डॉ.पंजाबराव भाऊसाहेब देशमुख यांच्या जीवन प्रवासावर आधारित संपूर्ण डॉक्युमेंटरी फिल्म गावकऱ्यांना गावाच्या मधोमध म्हणजे गांधी चौक येथे दाखवण्यात आली व अशा प्रकारे दिवस चौथा हा चा कार्यकाळ पूर्ण झाला.

### ०५ फेब्रुवारी २०२४ दिवस पाचवा (सोमवार)

रोजी शिबिराची सुरुवात सकाळी प्रार्थना व ध्यान साधने होऊन त्यानंतर स्वयंसेवकांनी ग्राम शिराळा श्रमदान येथे केले.शिबिराच्या पाचव्या दिवशी ग्राम शिराळा येथील शेतकऱ्यांसाठी कृषी विषयक कार्यशाळा शाळेचे आयोजन करण्यात आले होते आणि या कार्यशाळेमध्ये शेतकऱ्यांना शेती व हंगामी पिके यावर मार्गदर्शन करण्यासाठी व त्यांच्यासोबत संवाद साधण्यासाठी प्रादेशिक संगोपन केंद्र, पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला येथील डॉ.मंगेश दांडगे उपस्थित होते. डॉ. मंगेश दांडगे यांनी गावातील शेतकऱ्यांना हंगामी पिके व त्याच्या संगोपन कसे करायचे याबद्दल मार्गदर्शन केले तसेच त्यांच्या शंकांचे निरसन केले.शेती सोबतच पूरक व्यवसाय म्हणून मशरूम उत्पादन व गांडूळ खत निर्मिती व व्यवसाय याबद्दल सुद्धा या कार्यशाळेमध्ये मार्गदर्शन करण्यात आले हे मार्गदर्शन शिवाजी विज्ञान महाविद्यालयाचे प्राध्यापक डॉ.गणेश हेडाऊ सर आणि डॉ.अंकित काळे सर यांनी केले.

संध्याकाळी स्वयंसेवकांसाठी प्रार्थना व नवच येत नाही योग्य क्रियेचे आयोजन होते आणि पाचव्या दिवसाच्या शेवटी विद्यार्थ्यांसाठी कवी संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते या कवी

संमेलनामध्ये डॉ.स्वप्निलअडसड व प्राध्यापक संदीप गावंडे यांनी आपल्या कवितांचे सादरीकरण केले व अशाप्रकारे शिबिरातल्या पाचव्या दिवसाचे समारोपण करण्यात आले.

## ६ फेब्रुवारी २०२४ दिवस सहावा (मंगळवार)

हा शिबिराच्या सहावा दिवस व रोजच्याच प्रमाणे याही दिवसाची सुरुवात प्रार्थना योगासने व श्रमदानांनी झाली.श्रमसंस्कार शिबिराच्या सहाव्या दिवशी महिला व बाल स्वास्थ जनजागृती अंतर्गत शिराळा ग्रामस्थांसाठी व तेथील शालेय विद्यार्थ्यांसाठी आरोग्य व तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते या तपासणी शिबिरासाठी जिल्हा शल्य चिकित्सक व जिल्हा रुग्णालय व रेड रिबन क्लब अमरावती येथील श्याम वाहने व त्यांचे चम्मू उपस्थित होते तसेच या आरोग्य शिबिरामध्ये शिवाजी विज्ञान महाविद्यालय येथील सूक्ष्मजीवशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांनी रक्त तपासणी व रोख निदान शिबिर सुद्धा घेतले. या शिबिरामध्ये जिल्हा शल्य चिकित्सक रुग्णालय अमरावती येथील चमुने ग्रामस्थांचे सिकलसेल ॲनिमिया या रोगाचे साठी सुद्धा चाचण्या केल्या व संशयित आढळलेल्या रुग्णांना तपासणीसाठी जिल्हा शल्य चिकित्सालय अमरावती येथे बोलवण्यात आले.

शिबिराच्या पाचव्या दिवशी दुपारी रा.से.यो.स्वयंसेवकांसाठी बौद्धिक क्षेत्र आयोजित करण्यात आले होते या बौद्धिक सत्रामध्ये अंधश्रद्धा परंपरा व तरुणांच्या दृष्टिकोन या विषयावर प्राध्यापक कीर्ती काळमेघ यांनी विद्यार्थ्यांना आपल्या स्वतःच्या जीवनातील अनुभव सांगून आणि अंधश्रद्धा आपल्या जीवनामध्ये किती खोलवर रुजलेली आहे आणि त्याचे कसे परिणाम होतात आणि त्याबद्दल आजच्या तरुण पिढीने जागरूक राहणे अत्यंत गरजेचे आहे अशा प्रकारचे अतिशय सुंदर मार्गदर्शन त्यांनी या बौद्धिक सत्रामध्ये केले. शिबिराच्या सहाव्या दिवसाच्या शेवटच्या सत्रामध्ये शिवाजी विज्ञान महाविद्यालयाचे प्राध्यापक डॉक्टर गजानन वाघ यांनी मेळघाटातील पक्षी यांच्या बद्दल माहिती व मार्गदर्शन विद्यार्थ्यांना केले. या सत्रामध्ये सरांनी मेळघाट यामध्ये आढळून येणारे विविध प्रकारचे पक्षी व बदलत्या हवामानाचे त्यांच्यावर होणारे परिणाम व त्यांच्या बद्दल संपूर्ण माहिती या सत्रामध्ये विद्यार्थ्यांना दिली.

## ७ फेब्रुवारी २०२४ दिवस सातवा (बुधवार)

विद्यार्थ्यांचे शारीरिक स्वास्थ सुदृढ रहावे याकरिता शिबिराच्या सातव्या दिवसाची सुरुवात नेहमीप्रमाणे प्रार्थना योगासने यांनी करण्यात आली.त्यानंतर प्राध्यापक डॉक्टर गजानन वाघ यांच्यासोबत शिराळा ग्राम येथील आढळून येणाऱ्या विविध पक्षांच्या निरीक्षणासाठी राष्ट्रीय स्वयंसेवक यांचा चमू तसेच तेथील शालेय विद्यार्थ्यांना घेऊन येतील पक्षी निरीक्षण करण्यात आले. शिबिराच्या सातव्या दिवशीच्या बौद्धिक क्षेत्रामध्ये प्राध्यापक सुरज हिरे यांनी राष्ट्रीय सेवा योजना व सामाजिक

मूल्ये याबद्दल स्वयंसेवकांना अति उत्कृष्ट असे मार्गदर्शन केले आणि या मार्गदर्शनादरम्यान त्यांनी विविध प्रकारच्या प्रात्यक्षिकाद्वारे मुलांना छोटे छोटे व मूलभूत असे मूल्य समजावून सांगितले.

प्रा. हेरे सरांचं बौद्धिक सत्र विद्यार्थ्यांनी खूपच हिरीरीने व आवडीने सहभागी होऊन या सत्राच्या आनंद घेतला.याच दिवशी महिलांच्या सशक्ति करण्  व सबलीकर व सबलीकरणासाठी यासाठी सत्र आयोजित केले होते या सत्रामध्ये प्राध्यापक डॉक्टर संगीता इंगोले पर्यावरण शास्त्र विभाग श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय अमरावती यांनी ग्राम शिराळा येथील महिलांना आर्थिक सशक्तिकरण हे किती महत्त्वाचे आहे हे समजावून सांगितले आणि प्रत्येक महिलेने स्वतःच्या आर्थिक सशक्ति करण्यासाठी छोट्या तुला छोटा व्यवसाय करून सुद्धा आपण कसे पुढे जाऊ शकतो याबद्दल मार्गदर्शन केले तसेच पर्यावरण संवर्धनामध्ये महिलांच्या असलेला महत्त्वाचा वाटा याबद्दलही अतिशय उत्कृष्ट असे मार्गदर्शन त्यांनी येथे केले. या क्षेत्रामध्ये प्राध्यापक डॉक्टर जयश्री धोटे जीवशास्त्र विभाग श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय अमरावती यांनी गावातील महिलांना त्यांच्यासाठी असला असणारे विविध कायदे याबद्दल माहिती दिली आणि आपण समाजामध्ये जागरूकतेने राहावे याबद्दलही मार्गदर्शन केले.शिबिराच्या सातव्या दिवसाच्या समारोप सांस्कृतिक कार्यक्रम व प्रार्थनेने करण्यात आला.

## ८ फेब्रुवारी २०२४ दिवस आठवा (गुरुवार)

शिबिराच्या आठवा व अंतिम दिवस आणि या दिवसाची सुरुवात सुद्धा सातत्याने नेहमीप्रमाणे प्रार्थना व योगासनांनी करण्यात आली.ग्राम शिराळा येथे राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांनी श्रमदान केले. या आठ दिवसीय विशेष श्रमसंस्कार शिबिराचे समारोपीय कार्यक्रम दिनांक ०८ फेब्रुवारी २०२४ रोजी ग्राम शिराळा येथे प्राचार्य डॉक्टर गजाननकोरपे यांच्या अध्यक्षतेत घेण्यात आली.या समारंभमध्ये प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.हरिहर लुंगे माजी अंतर्गत गुणवत्ता व हमी कक्षा चे संयोजक, डॉ.वामन बरडे अंतर्गत गुणवत्ता व हमी कक्षा चे संयोजक डॉ. बरडे, कु.अंकिता तायडे सरपंच ग्राम शिराळा, श्री अनिकेत खाडे उपसरपंच ग्राम शिराळा समारोपीय कार्यक्रमाला उपस्थित सर्व मान्यवरांनी विद्यार्थ्यांचे मार्गदर्शन केले व त्यांचे कौतुकही केले.  या शिबिराच्या समारोपय कार्यक्रमांमध्ये विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले आणि या शिबिरामधून त्यांना किती गोष्टी शिकायला मिळाले व त्यांच्या जडणघडणीमध्ये या शिबिराचे किती महत्त्व आहे हे सुद्धा त्यांनी व्यक्त केले.

अशाप्रकारे राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांनी ग्राम शिराळा येथे आयोजित विशेष सेवा संस्कार शिबिरामध्ये सहभागी होऊन व आयोजित सर्व उपक्रमामध्ये आपला सहभाग नोंदवून हे आठ दिवस अतिशय सुंदर पद्धतीने पूर्ण केले आणि समारोपीय कार्यक्रमानंतर या कार्यक्रमाची

सांगता करून शिवाजी विज्ञान महाविद्यालय अमरावती येथील राष्ट्रीय सेवा योजना प्रमुख हा अमरावती करिता रवाना झाला.



**श्रम संस्कार शिबिर ग्राम शिराळ्याला राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक प्रवासाला निघतांना चे छायाचित्**



**श्रम संस्कार शिबिर ग्राम शिराळ्याला राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक प्रवासाला निघतांना चे छायाचित्**




**श्रम संस्कार शिबीर सभागृहाची साफ-सफाई तसेचआतील स्वच्छता करतांना स्वयंसेवक**



**श्रमसंस्कार शिबिर सभागृहाबाहेरील जागेची साफ-सफाई तसेच स्वच्छता करतांना स्वयंसेवक**




सकाळी पहाटे नवचेतना योगक्रिया प्राणायाम करतांना स्वयंसेवक



श्रम संस्कार शिबिर ग्राम शिराळा येथे शिबीराला उद्घाटनला लाभलेले प्रमुख अतिथि व प्राचार्य




मानिनय प्राचार्यांच्या हस्ते प्रमुख अतिथींचे स्वागत




गावातील सरपंच यांच्या वडीलांचे स्वागत करताना रा से यो कार्यक्रम अधिकारी



**गावात राबविण्यात आलेले ग्रामस्वच्छता अभियान, त्या वेळची छायाचित्रे**



**गावात राबविण्यात आलेले ग्रामस्वच्छता अभियान, त्या वेळची छायाचित्रे**



तंत्रज्ञानावर आधारीत रोबोटिक्स कार्यक्रमा दरम्यान विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणारे प्रमुख अतिथी



तंत्रज्ञानावर आधारीत रोबोटिक्स कार्यक्रमा दरम्यान विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिक करून दाखवताना प्रमुख अतिथी



**श्रम संस्कार शिबिर ग्राम शिराळा येथे शिबीराला उद्घाटनला लाभलेले प्रमुख अतिथि व प्राचार्य विद्यार्थ्यांशी हितगुज करताना**




**अध्यात्म व ज्ञानसाधना सराव व हितगुज**




श्री संत गजानन महाराज मंदिर परिसराची साफ-सफाई करतांना स्वयंसेवक




रांगोळी व कार्यक्रमाचे स्थळ सुशोभित करताना



डॉ. पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालयाचा वैद्यकीय चमुने राबवलेले निशुल्कआरोग्य तपासणी शिबिर




डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या शैक्षणिक सामाजिक तसेच राजकीय कार्याचा परिचयसंदर्भात पथनाट्य व रॅली




सायबर सेक्युरिटी व स्वच्छता अभियाना वर आधारित पथनाट्य




मैदानी खेळ खेळतांना विद्यार्थी




पक्षी मित्र डॉ. गजानन वाघ विद्यार्थ्यांना पक्षी संवर्धनात संदर्भात माहिती तसेच हितगुज करताना



विद्यार्थ्यांना स्वालंबनाचे व श्रमसाधनेचे मार्गदर्शन करताना महाविद्यालयाचे प्राचार्य




विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना आमंत्रित व्यक्ती




महिला उद्योजक व बचतगट कार्यक्रम




[illegible]




**अंतर्गत गुणवत्ता व हमी कक्षा चे संयोजक डॉ. बरडे सर विद्यार्थ्यांना समारोपिय मार्गदर्शन करताना**